असावें हें उचित होय. हे विचारी लोक परभाषेंत आपले विचार प्रकट करूं लागले तर त्यांनीं स्वभाषेचा मोठा अक्षम्य अन्याय केला असें होतें. घरच्या गरीब माणसांची उपासमार करून बाहेरच्या श्रीमंतांना मेजवानी करणारा इसम स्वकीयांच्या व परकीयांच्या उपहासास मात्र पात्र होतो. असे गृहस्थ आपल्या देशांत गेल्या पंचायशी वर्षांत बरेच झाले. पैकीं कित्येकांची नांवनिशी त्यांनीं केलेल्या कांहीं ग्रंथ व निबंध यांसह पुढील पिढ्यांच्या स्मरणार्थ येथें देतोंः—

| नांव. | इंग्रजी ग्रंथ व लेख. | मराठी ग्रंथ व लेख. |
|---|---|---|
| १ बाळशास्त्री जांभेकर | दोन तीन ताम्रपटांवर निबंध. | लहान मराठी व्याकरण, इतिहासाचें भाषांतर, वगैरे. |
| २ दादोबा पांडुरंग | स्वीडनबुर्गच्या मतांवर विचार. | मोठें व्याकरण व त्याची पूरणिका. |
| ३ विश्वनाथ नारायण मंडलिक | पौराणिक विषयांवर इंग्रजी निबंध. | सवईवर मराठी निबंध, एल्फिन्स्टनच्या इतिहासाचें भाषांतर. |
| ४ महादेव मोरेश्वर कुंटे | आर्य संस्कृतीचीं स्थित्यंतरें, ऋषि. पूर्वमीमांसेचें भाषांतर, एक इंग्रजी वर्तमानपत्र व अनेक व्याख्यानें. | पूर्वमीमांसेचें भाषान्तर, शिवाजी काव्य व व्याख्यानें. |
| ५ शंकर पांडुरंग पंडित | वेदाचें भाषान्तर, नाटकांवर टीपा, दोन चार ताम्रपटांवर निबंध. | तुकारामावर निबंध, वेदाचें भाषान्तर. |
| ६ काशीनाथ त्र्यंबक तेलंग | ताम्रपटांवर निबंध, रामायणावर निबंध, गीतेचीं गद्य व पद्य भाषांतरें, अर्थशास्त्रावर निबंध, पौराणिक विषयांवर निबंध, राजकीय व सामाजिक व्याख्यानें, मराठ्यांच्या इतिहासावर निबंध. | शहाणा नेथन (भाषान्तर), इतर एक दोन व्याख्यानें व भाषान्तरें. |
| ७ महादेव गोविंद रानडे | राजकीय, धार्मिक, सामाजिक, नैतिक; व इतर विषयांवर व प्रसंगांवर शेकडों व्याख्यानें व निबंध. मराठ्यांचा इतिहास, | शेकडा व्याख्यानें |

| | | |
|---|---|---|
| ८ डॉ० भांडारकर | दख्खनचा निबंधवजा ईतिहास. ताम्रपटांवर निबंध, पतंजलीवर निबंध, महाराष्ट्री व मराठी भाषांवर निबंध, धार्मिक व सामाजिक व्याख्यानें | प्रार्थनासमाजांतील प्रार्थना व कीर्तनें. |
| ९ रा. बाळ गंगाधर टिळक | अग्रहायण व आर्यांचें मूलस्थान, मराठा वर्तमानपत्रांतील कांहीं क्षणिक किंमतीचे निबंध आणि व्याख्यानें. | केसरींतील लेख व व्याख्यानें. |
| १० पंडिता रमाबाई | हिंदू विधवा, वगैरे दोन चार लहान मोठीं मध्यम पुस्तकें. | एक दोन मराठी पुस्तकें. |
| ११ दिवाण रघुनाथराव | धार्मिक, सामाजिक व राजकीय टिपणें. | कांहीं क्षुल्लक मराठी कविता व वाक्यें. |
| १२ सर त्रावणकोर माधवराव | सामाजिक धार्मिक व राजकीय टिपणें. | कांहीं आर्या. |
| १३ महाराज सयाजीराव गायकवाड | गिबनच्या इतिहासाचा सारांश, कांहीं निबंध व व्याख्यानें. | आज्ञेनें झालेले शेकडों मराठी लहान मोठे ग्रंथ. |
| १४ डॉ. रणछोड कीर्तिकर | वनस्पतीवर एक दोन निबंध. | काव्यें व निबंध. |